अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अखत्यारितील अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमासाठी राज्यात कार्यरत शासकीय / अशासकीय अनुदानीत व विना अनुदानीत संस्थांमध्ये दुसरी पाळी सुरु करणे, निकष निश्चित करणे, इत्यादी.
शासकीय तंत्र निकेतनांमध्ये दुसऱ्या पाळीकरीता पदनिर्मिती (शिक्षकीय).

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : टिईडी २००९/(१४/०९)/तांशि-५,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १ जून,२०१०.

संदर्भ :- १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.मान्यता २००८/(१७/०८)/तांशि-६, दि.१४ ऑगस्ट,२००८.
२) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या दि.२६-८-२००८ चे पत्र.
३) राज्य मंत्रीमंडळाने त्यांच्या दि.६ मे,२०१० रोजी घेतलेला निर्णय.

प्रस्तावना

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अखत्यारितील अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमासाठी राज्यात कार्यरत शासकीय/अशासकीय अनुदानित व विना अनुदानित संस्थांमध्ये दुसरी पाळी सुरु करण्याच्या प्रस्तावावर विचार करुन, अशासकीय विना अनुदानित संस्थांमध्ये सन २००८-०९ पासून दुसरी पाळी सुरु करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. आता एकूण ४२ शासकीय तंत्र निकेतनांमध्ये टप्प्याटप्प्यांमध्ये दुसरी पाळी सुरु करण्यास, तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने निश्चित केलेले निकष विचारात घेऊन अनुज्ञेय प्रवेश क्षमता, दुसऱ्या पाळीकरीता वेळापत्रक, ग्रंथालयातील पुस्तकांची संख्या, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदसंख्या इत्यादी संदर्भात निकष ठरविणे तसेच शासकीय तंत्र निकेतनांमध्ये सुरु करावयाच्या दुसऱ्या पाळीकरिता आवश्यक ती पदे निर्माण करणे याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता. उक्त प्रश्नांचा सर्वांगिण विचार करुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय

राज्यातील शासकीय / अशासकीय अनुदानित व विना अनुदानित अभियांत्रिकी पदवी व पदविका, संस्थांमध्ये दुसरी पाळी सुरु करण्याच्या संदर्भात, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने ठरविलेले निकष विचारात घेऊन, दुसऱ्या पाळीतील तंत्र निकेतन सुरु करण्यास इच्छुक असणाऱ्या संस्थांकरीता खालील निकष शासन याव्दारे निश्चित करीत आहे.

१) अर्ज करण्यासाठी पात्रता :-
अभियांत्रिकी पदविका व अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांना, तिच्या स्थापनेपासून किमान दोन वर्षे पूर्ण झालेले असावेत.

D:\S.O.t.e-5\meeting.doc\94.09.doc
रोटेटा/एच-११७८[२००-६-२०१०]-१

Principal
Govt. Polytechnic, Jalgaon

प्रत :- मा.कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, जळगाव

२) दुसऱ्या पाळीसाठी प्रवेश क्षमता :

पदविका संस्थांसाठी १२० ते ३००, पदवी संस्थांसाठी १२० ते २४० या दरम्यान प्रवेश क्षमता अनुज्ञेय असेल.

दोन्ही पाळीची वेळ सकाळी ७.०० ते दुपारी १.३० आणि दुपारी २.०० ते रात्री ८.३० अशी असेल.

३) ग्रंथालयातील पुस्तकांची संख्या :

ग्रंथालयातील पुस्तकांची संख्या २० टक्क्यांनी वाढविणे अनिवार्य असेल.

ग्रंथालयाची वेळ गरजेनुसार निश्चित करण्यात यावी.

४) प्राचार्य / उपप्राचार्य :

पहिल्या पाळीसाठी प्राचार्य / संचालक असतील. दुसऱ्या पाळीसाठी विभाग प्रमुख किंवा वरिष्ठ अधिव्याख्याता, ज्यांचा ५ वर्षांचा अनुभव असेल, अशांना उप प्राचार्य/ उपसंचालक म्हणून नियुक्ती करण्यात यावी.

५) पदनिर्मिती (शिक्षकीय) :

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकानुसार अभ्यासक्रमांची संख्या, प्रवेश क्षमता, इत्यादींचा विचार करुन, विद्यार्थी / शिक्षक यांच्या गुणोत्तर विचारात घेऊन एकुण अनुज्ञेय पदांची परिगणना करण्यात यावी. त्यानुसार अनुज्ञेय शिक्षकीय पदांची ५० टक्के इतकी नियमित पदे निर्माण करण्यात यावीत. उक्त पदांवर अतिरिक्त शिक्षकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी व २५ टक्के शिक्षकीय पदांची गरज अभ्यागतांद्वारे आणि २५ टक्के शिक्षकीय पदांची गरज, नियमित शिक्षकीय कर्मचाऱ्यांकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात यावे. अशाप्रकारच्या अतिरिक्त कार्यभारासाठी द्यावयाचा मोबदला मूळ वेतनाच्या २५ टक्के वेतन व त्यावरील महागाई भत्ता अनुज्ञेय असेल.

६) पदनिर्मिती (शिक्षकेतर) :

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संदर्भात अनुज्ञेय पदांच्या ५० टक्के पदे निर्माण करण्यात यावी. उर्वरीत ५० टक्के पदांचा अतिरिक्त कार्यभार सध्या कार्यरत असलेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना देऊन काम करुन घेण्यात यावे. अशाप्रकारच्या अतिरिक्त कार्यभारासाठी द्यावयाचा मोबदला मूळ वेतनाच्या २० टक्के व त्यावरील महागाई भत्ता अनुज्ञेय असेल.

२. राज्यातील एकूण ४२ शासकीय तंत्र निकेतनांमध्ये टप्प्याटप्प्याने दुसरी पाळी सुरु करण्यास शासन याद्वारे मान्यता देत आहे.

शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून प्रथम टप्प्यांतर्गत सोबतच्या विवरणपत्र 'अ' मध्ये दर्शविलेल्या एकूण १९ शासकीय तंत्र निकेतनांमध्ये तीन अभ्यासक्रमांसह (६० प्रवेश क्षमता प्रती अभ्यासक्रम) दुसरी पाळी सुरु करण्यात यावी. यापैकी अंबड येथील शासकीय तंत्र निकेतनांमध्ये दुसरी पाळी सुरु करण्यास अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची नियमानुसार मान्यता घेण्यात यावी.

Principal
Govt. Polytechnic, Jalgaon

D:\S.O.t.e-5\meeting.doc\94.09.doc
एच-२२५८ -१३

३. शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून सुरु करावयाच्या एकूण १९ शासकीय तंत्र निकेतनांमध्ये तीन अभ्यासक्रमांसह दुसरी पाळी सुरु करण्यासाठी खाली नमूद केलेली शिक्षकीय पदे निर्माण करण्यास शासन याद्वारे मान्यता देत आहे.

| शिक्षकीय पदे | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी (५व्या वेतन आयोगानुसार) | पदसंख्या | शेरा |
| १ | उपप्राचार्य | रु.१२०००-१८३०० | १९ (एकोणीस) | |
| २ | विभाग प्रमुख | रु.१२०००-१८३०० | ५७ (सत्तावन्न) | प्रत्येक शासकीय तंत्र निकेतनांकरीता विभाग प्रमुख स्थापत्य अभियांत्रिकी, विभाग प्रमुख यंत्र अभियांत्रिकी, विभाग प्रमुख इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी प्रत्येकी एक याप्रमाणे पदांची विगतवारी करण्यात यावी. |
| ३ | अधिव्याख्याता | रु.८०००-१३५०० | २४५ (दोनशे पंचेचाळीस) | प्रत्येक शासकीय तंत्र निकेतनांकरीता अधिव्याख्याता स्थापत्य अभियांत्रिकी, अधिव्याख्याता यंत्र अभियांत्रिकी, अधिव्याख्याता इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी याप्रमाणे पदांची विगतवारी आवश्यकतेनुसार करण्यात यावी. |

४. वर नमूद केल्याप्रमाणे निर्माण करावयाच्या पदांपैकी २५ टक्के पदांची गरज अतिरिक्त कार्यभार देऊन व २५ टक्के पदांची गरज अभ्यागतांमार्फत भागविण्यात यावी.

५. वर नमूद केलेल्या एकुण १९ शासकीय तंत्र निकेतनांकरीता आवश्यक शिक्षकेतर पदे निर्माण करण्याबाबतचा निर्णय स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल.

६. उपरोक्त बाबींवरील खर्च खाली नमूद केलेल्या लेखाशिर्षाखाली वित्तीय वर्ष २०१०-११ व त्यानंतर वेळोवेळी मंजूर करण्यात आलेल्या / येणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

'लेखाशिर्ष : २२०३-तंत्र शिक्षण
१०५-तंत्र निकेतने, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना
१०५ (००)(११) अस्तित्वात असलेल्या शासकीय तंत्र निकेतनांमध्ये दुसरी पाळी सुरु करणे (२२०३ २७६९)
मागणी क्रमांक : डब्ल्यू-३'.

Principal
Govt. Polytechnic, Jalgaon

D:\S.O.t.e-5\meeting.doc\94.09.doc
एच-११७८ -२

प्रत :- मा.कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, जळगाव

७. हे आदेश राज्यमंत्री मंडळाने त्यांच्या दि.६ मे,२०१० रोजी मंत्रीमंडळ बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयाला अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

८. हे आदेश राज्य शासनाच्या www.maharashtra.govt.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(व्यं. ह. कुलकर्णी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म. रा., मुंबई.
२. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, अमरावती, औरंगाबाद,नागपूर.
३. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, नागपूर / मुंबई.
४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
७. सर्व प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतने,
८. सर्व प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये,
९. वित्त विभाग, व्यय-५, मंत्रालय, मुंबई.
१०. उच्च व तंत्र शिक्षण विभाग कार्यासन क्रमांक तांशि १,२,३,४ मंत्रालय, मुंबई
११. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१२. मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१३. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४. निवड नस्ती, तांशि ५/ पदनिर्मिती तांशि ५.

Principal
Govt. Polytechnic, Jalgaon

D:\S.O,t.c-5\meeting.doc\94.09.doc
एच–११५८ –२अ

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : टिईडी २००९/(९४/०९)/तांशि-५, दि.१ जुन,२०१०.

## विवरणपत्र-अ

राज्यातील एकूण ३३ शासकीय तंत्र निकेतनांपैकी पहिल्या टप्प्यांतर्गत दुसऱ्या पाळीमध्ये सुरु करावयाचे
१९ तंत्र निकेतन व अभ्यासक्रम यांची माहिती दर्शविणारे विवरणपत्र.

| अ.क्र. | शासकीय तंत्र निकेतनाचे नांव | प्रस्तावित शाखा | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १ | शासकीय तंत्र निकेतन, मुंबई | १. स्थापत्य अभियांत्रिकी | ६० |
| | | २. यंत्र अभियांत्रिकी | ६० |
| | | ३. इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी | ६० |
| २ | शासकीय तंत्र निकेतन, ठाणे | १. स्थापत्य अभियांत्रिकी | ६० |
| | | २. यंत्र अभियांत्रिकी | ६० |
| | | ३. इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी | ६० |
| ३ | शासकीय तंत्र निकेतन, रत्नागिरी | १. स्थापत्य अभियांत्रिकी | ६० |
| | | २. यंत्र अभियांत्रिकी | ६० |
| | | ३. इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी | ६० |
| ४ | शासकीय तंत्र निकेतन, पेण | १. स्थापत्य अभियांत्रिकी | ६० |
| | | २. यंत्र अभियांत्रिकी | ६० |
| | | ३. इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी | ६० |
| ५ | शासकीय तंत्र निकेतन, मालवण | १. स्थापत्य अभियांत्रिकी | ६० |
| | | २. यंत्र अभियांत्रिकी | ६० |
| | | ३. इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी | ६० |
| ६ | शासकीय तंत्र निकेतन, पुणे | १. स्थापत्य अभियांत्रिकी | ६० |
| | | २. यंत्र अभियांत्रिकी | ६० |
| | | ३. इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी | ६० |
| ७ | शासकीय तंत्र निकेतन, कराड | १. स्थापत्य अभियांत्रिकी | ६० |
| | | २. यंत्र अभियांत्रिकी | ६० |
| | | ३. इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी | ६० |
| ८ | शासकीय तंत्र निकेतन, कोल्हापूर | १. स्थापत्य अभियांत्रिकी | ६० |
| | | २. यंत्र अभियांत्रिकी | ६० |
| | | ३. इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी | ६० |
| ९ | शासकीय तंत्र निकेतन, सोलापूर | १. स्थापत्य अभियांत्रिकी | ६० |
| | | २. यंत्र अभियांत्रिकी | ६० |
| | | ३. इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी | ६० |
| १० | शासकीय तंत्र निकेतन, नाशिक | १. स्थापत्य अभियांत्रिकी | ६० |
| | | २. यंत्र अभियांत्रिकी | ६० |
| | | ३. इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी | ६० |
| ११ ✓ | शासकीय तंत्र निकेतन, जळगांव | १. स्थापत्य अभियांत्रिकी | ६० |
| | | २. यंत्र अभियांत्रिकी | ६० |
| | | ३. इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी | ६० |
| १२ | शासकीय तंत्र निकेतन,औरंगाबाद | १. स्थापत्य अभियांत्रिकी | ६० |
| | | २. यंत्र अभियांत्रिकी | ६० |
| | | ३. इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी | ६० |
| १३ | शासकीय तंत्र निकेतन, नांदेड | १. स्थापत्य अभियांत्रिकी | ६० |
| | | २. यंत्र अभियांत्रिकी | ६० |
| | | ३. इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी | ६० |

Principal
Govt. Polytechnic, Jalgaon



प्रत :- मा.कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, जळगाव

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | शासकीय तंत्र निकेतन, यवतमाळ | १. स्थापत्य अभियांत्रिकी<br>२. यंत्र अभियांत्रिकी<br>३. इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी | ६०<br>६०<br>६० |
| १५ | शासकीय तंत्र निकेतन, अमरावती | १. स्थापत्य अभियांत्रिकी<br>२. यंत्र अभियांत्रिकी<br>३. इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी | ६०<br>६०<br>६० |
| १६ | शासकीय तंत्र निकेतन, नागपूर | १. स्थापत्य अभियांत्रिकी<br>२. यंत्र अभियांत्रिकी<br>३. इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी | ६०<br>६०<br>६० |
| १७ | शासकीय तंत्र निकेतन, ब्रम्हपुरी | १. स्थापत्य अभियांत्रिकी<br>२. यंत्र अभियांत्रिकी<br>३. इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी | ६०<br>६०<br>६० |
| १८ | शासकीय तंत्र निकेतन, जालना | १. स्थापत्य अभियांत्रिकी<br>२. यंत्र अभियांत्रिकी<br>३. इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी | ६०<br>६०<br>६० |
| १९ | शासकीय तंत्र निकेतन, अंबड, जालना | १. स्थापत्य अभियांत्रिकी<br>२. यंत्र अभियांत्रिकी<br>३. इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी | ६०<br>६०<br>६० |

Principal
Govt. Polytechnic, Jalgaon

---------

D:\S.O.t.e-5\meeting.doc\94.09.doc
एच-११७८ -३३०

राज्यातील अल्पसंख्यांक बहुल भागातील
विद्यमान तंत्र निकेतनामध्ये अल्पसंख्यांक
विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून
दुसरी पाळी सुरू करणेबाबत.

No/GP/J/Adm/
Date: 19 SEP 2011

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
शासन निर्णय क्र. टिईडी-२०१०/(३३४/२०१०)/तांशि-५,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक :१३ सप्टेंबर, २०११.

संदर्भ : १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. मान्यता२००८/(१७/०८)तांशि-६,दि.१४.८.०८.
२) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. १०/पदविका/व्दि.पा./२०११/३२३,दि. ०४ जुलै २०११

2377
Inward No. 19 SEP 2011
Govt. Polytechnic, Jalgaon

**प्रस्तावना** : जागतिकीकरणामुळे मोठया प्रमाणात औद्योगिकरण होत असून देशात तसेच राज्यातही
औद्योगिकरण झपाटयाने होत आहे.अगामी वर्षात राज्यात एकूण लागणाऱ्या कुशल मनुष्यबळाचा विचार
करता व्यवसाय शिक्षणाची विद्यमान प्रवेश क्षमता व व्यवसाय शिक्षणाच्या सुविधांचे प्रमाण वाढविणे अत्यंत
आवश्यक आहे मा. पंतप्रधनांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या राष्ट्रीय कौशल्य विकास
परिषदेने सन २०२२ पर्यंत देशात ५०० दशलक्ष कुशल मनुष्यबळाची निर्मिती करण्याचे उद्दीष्ट निश्चित
केल्याने तंत्र निकेतनातील प्रवेशक्षमतेत भरीव वाढ करुन अधिकाधिक कुशल मनुष्यबळ उपलब्ध करणे
अनिवार्य ठरते राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील उमेदवारांनाही व्यवसाय शिक्षणाच्या व तदनुषंगाने
रोजगार व स्वंरोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यात येऊन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे हे शासनाचे
उद्दीष्ट आहे.

राज्यातील ऐकुण ४२ शासकीय तंत्र निकेतनापैकी पहिल्या टप्यात १९ शासकीय तंत्रनिकेतनात
१.स्थापत्य अभियांत्रिकी २. यंत्र अभियांत्रिकी ३ इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी या अभ्यासक्रमासह प्रत्येकी ६०
प्रवेशक्षमतेसी दुसरी पाळी सुरू करण्याचा निर्णय राज्य मंत्रीमंडळाने दि. ६.५.२०१० रोजी झालेल्या
मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेतला होता.मंत्रीमंडळाच्या निर्णयानुसार दि. १ जुन २०१० च्या शासन निर्णयानुसार
सदर संस्थामध्ये दुसरी पाळी सुरू करणे, निकष निश्चिती करणे व पदनिर्मिती (शिक्षकीय) करण्यात आलेली
आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून शासकीय तंत्र निकेतन अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर,
नाशिक, पुणे व कोल्हापूर या ७ ठिकाणी दुसरी पाळी सुरु करण्यात आलेली आहे.अल्पसंख्यांक बहुल
क्षेत्रातील ठाणे, सोलापूर, यवतमाळ, नांदेड, जळगांव, मुंबई व मुंबईउपनगर या ७ शासकीय तंत्र निकेतनात
शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी दुसरी पाळी सुरू करण्याचा निर्णय
अल्पसंख्यांक विकास विभागाने घेतला असून त्यासाठी ऐकुण १५.१८ कोटी ऐवढा नियतव्यय आर्थिक वर्ष
२०११-१२ पासून तसेच पुढील वर्षासाठी/प्रत्येक वर्षी आवश्यक नियतव्यय दिला जाईल असे अल्पसंख्यांक
विकास विभागाने कळविलेले आहे. त्यामुळे उपरोक्त ७ शासकीय तंत्र निकेतनात अल्पसंख्यांक
विद्यार्थ्यांसाठी दुसरी पाळी सुरू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. उक्त बाबींचा सर्वांगिन
विचार करुन शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

Principal
Govt. Polytechnic, Jalgaon

प्रत – मा. कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, जळगांव

**शासन निर्णय :-** उपरोक्त पार्श्वभुमिवर अल्पसंख्यांक समाजातील उमेदवारांना रोजगार व स्वयंमरोजगारांच्या संधी निर्माण होण्यासाठी राज्यातील ठाणे, सोलापूर, यवतमाळ, नांदेड, व जळगांव, या विद्यमान ५ शासकीय तंत्र निकेतनात प्रत्येकी ६० प्रवेशक्षमतेसह १. स्थापत्य अभियांत्रिकी २. यंत्र अभियांत्रिकी ३ इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी या अभ्यासक्रमासह तसेच मुंबई येथील शासकीय मुद्रण तंत्र संस्था येथे प्रिंटींग टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमासह व मुंब्रईउल्हासनगर येथील शासकीय तंत्रनिकेतनात १. संगणक अभियांत्रिकी २. विद्युत अभियांत्रिकी ३. उपकरणीकरण अभियांत्रिकी या अभ्यासक्रमासह प्रत्येकी ६० प्रवेशक्षमतेसह दुसरी पाळी शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून सुरू करण्यास खालील अटींच्या अधिन राहुन या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर तंत्र निकेतनामध्ये अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी दुसरी पाळी सुरू करावयाची असल्यामुळे त्यासाठी येणारा खर्च रु. १५.१८ कोटी ऐवढा नियतव्यय दरवर्षी अल्पसंख्यांक विकास विभागकडून उच्च व तंत्र शिक्षण विभागास उपलब्ध करून देण्यात येईल व त्याबाबतची सर्व कार्यवाही अल्पसंख्यांक विकास विभागाकडून करण्यात येईल व यासाठी अल्पसंख्याक विकास विभागामार्फत आवश्यक योजनेची आखणी करण्यात येईल.

२. आर्थिक वर्ष २०११-१२ मध्ये रु. २.५० कोटी ऐवढा निधी आकस्मीतता निधीमधून अल्पसंख्यांक विकास विभागाकडुन प्राप्त झाल्यानंतर उपरोक्त नमुद ७ शासकीय तंत्रनिकेतनात अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी दुसरी पाळी सुरू करण्यात येईल.

३. तंत्र निकेतनातील प्रवेशाच्या प्रवेशप्रक्रीयेनूसार सदर तंत्रनिकेतनातील दूसऱ्या पाळीची प्रवेशप्रक्रीया राबविण्याबाबत तंत्रशिक्षण संचालनालया मार्फत कार्यवाही करण्यात येईल.

४. अल्पसंख्यांकासाठी सुरू करावयाच्या सदर दुसऱ्या पाळीसाठी अल्पसंख्यांकासाठी ७० टक्के जागा व सर्व साधारण आणि राखिव प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ३० टक्के जागा राखुन ठेवण्यात याव्यात ज्या तंत्रनिकेतनामध्ये अल्पसंख्यांक समाजाकरीता मंजुर असलेल्या ७० टक्के कोटयामधून प्रवेशा करीता पुरेशाप्रमाणात उमेदवार उपलब्ध होणार नाहीत अशा रिक्त राहणाऱ्या जागांवर अल्पसंख्यांक समाजेत्तर सर्व साधारण व राखिव प्रवर्गाच्या उमदवारांना प्रवेश देण्यात यावा. सदर प्रवेश प्रचलित प्रवेश नियमावलीतील तरतुदी नूसार करण्यात यावेत.

५. सुरू करावयाच्या सदर दुसऱ्या पाळीसाठी आवश्यक अवर्ती व अनावर्ती खर्चाची तरतुद संचालक तंत्र शिक्षण संचालनालय यांनी अल्पसंख्याक विकास विभाग व उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडुन वेळोवेळी उपलब्ध करून घ्यावी. अल्पसंख्यांकासाठी सुरू करावयाच्या दुसऱ्या पाळी करीता संस्थेतील कर्मचाऱ्यांचे वेतन, कार्यलयीन खर्च , प्रवास खर्च, शिष्यवृत्ती व विद्यावेतने इत्यादी देयके कोषागारातुन आहरण व संवितरण करण्यासाठी संचालक, तंत्र शिक्षण मुंबई यांना नियंत्रक अधिकारी व संबंधीत संस्थेच्या प्राचार्यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषीत करण्यात येत आहे.

६. शासनाच्या संदर्भ क्र. १ येथे नमुद केलेल्या शासना निर्णयानूसार निर्माण करण्यात आलेल्या शिक्षकीय पदांच्या माध्यमांतुन सदर दुसऱ्या पाळीचे अभ्यासक्रम पुर्ण करण्यात यावे.

सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. २२८२निव्ही, दि. २४/८/२०११ व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.४९२/११/व्यय५, दि. २९/८/२०११ अन्वये मिळालेल्या मान्यतेनूसार व अल्पसंख्यांक विकास विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

(signature) ९ सप्टें २०११

Principal
Govt. Polytechnic ...

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(अ.म.अंबादे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, तंत्रशिक्षण , महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, बांद्रा (पूर्व), मुंबई ५१.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद, अमरावती, मुंबई, नाशिक,पुणे,
४. प्राचार्य, संबंधित शासकीय तंत्र निकेतने.

५. महालेखापाल( लेखा परिक्षा)महाराष्ट्र - १/२ मुंबई /नागपूर
६. महालेखापाल( लेखा व अनुज्ञेयता)महाराष्ट्र - १/२ मुंबई /नागपूर
७. सर्व संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
८. मा. मंत्री , उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
९. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
१०. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
११. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.(दोन प्रति)
१३. सर्व सहसचिव/ उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग , मंत्रालय, मुंबई.
१४. अवर सचिव , तांशि ३/ साशि १ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई.
१५. संबंधित संस्था.

प्रत माहितीसाठी :-

१. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ७वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली ११०००१.
२. सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डिंग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई.
३. निवडनस्ती.

Principal
Govt. Polytechnic, Jalgaon

प्रत :- मा.कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, जळगाव